**भारतीय वन अधिनियम, १९२७ मधील तरतूदीनुसार जप्त करून सरकारजमा केलेल्या मोटर वाहनांची संभाव्य/ अपेक्षित किंमत प्राप्त न झाल्यास लिलावात प्राप्त किंमतीस मंजूरी प्रदान करण्याचे अधिकार प्रादेशिक कार्यालय प्रमुख व विभाग प्रमुख स्तरावर प्रदान करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**महसूल व वन विभाग**

**शासन निर्णय क्रमांक: लिलाव-२०२०/प्र.क्र.१०२/फ-५**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक :- १७ मार्च, २०२१

**संदर्भ**:- १) प्रधान मुख्य वनसंरक्षक (उत्पादन व व्यवस्थापन), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचेकडील पत्र क्र. कक्ष-८/भांडार/वाहन/अपेक्षित किंमत/७८१/२०२०-२१ दि.२४/१२/२०२०

२) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.एफडीएम-२०१६/प्र.क्र.३३०/फ-२, दि.१ जानेवारी, २०२१

**प्रस्तावना:-**

भारतीय वन अधिनियम, १९२७ मधील तरतूदीनुसार बोजारहीत होऊन सरकारजमा झालेल्या मोटर वाहनांची विल्हेवाट जाहीर लिलावाद्वारे केली जाते. अशी सरकारजमा मोटर वाहने लिलावाकरीता ठेवण्यापुर्वी त्यांची अपेक्षित किंमत, संबंधित परिवहन अधिका-याने तांत्रिक निकषावर ठरवलेले दर तसेच प्रचलित बाजारभाव आणि मोटर वाहनांची अवस्था ईत्यादी बाबी विचारात घेऊन निश्चित केली जाते. तथापि, काही प्रकरणी लिलावाच्या प्रक्रीयेत अपेक्षित किंमतीपेक्षा कमी बोली प्राप्त झाल्यावर, प्राप्त झालेली बोली मंजूर करण्यासाठी प्रकरणे वृत्तप्रमुखांकडून प्रधान मुख्य वनसंरक्षक कार्यालयाकडे तसेच तेथून शासनास संदर्भ केली जातात. तथापि, वर नमूद केल्याप्रमाणे लिलावात प्राप्त होणारी किंमत ही प्रचलित बाजारभाव आणि मोटर वाहनांची अवस्था यावर निर्भर असते. मोटर वाहनांची विक्री जाहीर लिलावाद्वारे होत असल्याने जर अपेक्षित किंमतीपेक्षा कमी बोली प्राप्त झाल्यास अशी प्रकरणे प्रधान मुख्य वनसंरक्षक किंवा शासनास संदर्भ केल्यामुळे काही हेतू साध्य होत नसून उलट कालापव्यय करण्यासारखे ठरते. परिणामी, सरकारजमा होऊन शासनविहीत होऊन सुध्दा अशा मोटर वाहनांच्या विल्हेवाटीस विनाकारण विलंब होत असल्याची बाब प्रधान मुख्य वनसंरक्षक (उत्पादन व व्यवस्थापन) यांनी त्यांचे संदर्भिय पत्रान्वये निदर्शनास आणली होती. या पार्श्वभूमीवर सरकारजमा होऊन शासनविहीत झालेल्या मोटर वाहनांची विक्री करण्याबाबत क्षेत्रिय वन अधिका-यांना प्राधिकृत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

वित्त विभाग, शासन निर्णय दि.१७.०४.२०१५ अन्वये वित्तीय अधिकार नियम पुस्तिका-१९७८, भाग पहिला, उप विभाग-१ मधील अनु.क्र.१, २, ३ मधील नियम क्रमांक २ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन खालील पदांना, सरकारजमा मोटार वाहनांचा लिलाव प्रक्रीयेत विक्रीची किंमत मंजुर करण्याचे अधिकार प्रदान करण्यात येत आहेत :-

| अ.क्र. | किंमतीची मर्यादा | कार्यालय/पदनाम |
|---|---|---|
| अ | अपेक्षित किंमती एवढी अथवा अपेक्षित किंमतीपेक्षा जास्त किंमत प्राप्त झाल्यास | **प्रादेशिक कार्यालय प्रमुख**<br>उप वनसंरक्षक (सर्व),<br>उपसंचालक (व्याघ्र राखीव क्षेत्र) (सर्व),<br>विभागीय वन अधिकारी (स्वतंत्र कार्यालय असलेले),<br>स्वतंत्र उपविभागाचे उपविभागीय वन अधिकारी,<br>संचालक, वन प्रशिक्षण संस्था (सर्व),<br>वन अभियंता |
| ब | अपेक्षित किंमतीपेक्षा कमी किंमत प्राप्त झाल्यास | **विभाग प्रमुख**<br>अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (सर्व),<br>मुख्य वनसंरक्षक (सर्व),<br>वनसंरक्षक (सर्व) |

शासन निर्णय वित्त विभाग क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२, दि.१७.०४.२०१५ सोबत जोडलेल्या वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ भाग-पहिला, उपविभाग एक मधील अनु.क्र.१, २, ३ मधील नियम क्रमांक २ मधील अटीच्या अधीन राहून प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार तसेच या अनुषंगाने यापूर्वी वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेले शासन निर्णय अधिक्रमित करुन सदरहू शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०२१०३१७१६४१४६०६१९ असा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

GAJENDRA
PRAKASH NARWANE

Digitally signed by GAJENDRA PRAKASH NARWANE
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=088951d0088e627aa56c9ab088add1677b8ac27d637c5cdf80b730f756dce9e8, cn=GAJENDRA PRAKASH NARWANE
Date: 2021.03.17 16:46:57 +05'30'

**( गजेंद्र नरवणे )**
शासनाचे उप सचिव

**प्रति:-**

१) मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव
२) मा.राज्यमंत्री (वने) यांचे खाजगी सचिव
३) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
४) सर्व प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर
५) सर्व अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर
६) सर्व मुख्य वनसंरक्षक
७) सर्व वनसंरक्षक
८) सर्व उप वनसंरक्षक/विभागीय वन अधिकारी

९) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), १/२ महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर

१०) सह सचिव/ उप सचिव/ वित्त विभाग (विनियम), मंत्रालय, मुंबई-३२

११) मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय), महसूल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई-३२

१२) सह सचिव/ उप सचिव, महसूल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई-३२

१३) सर्व कार्यासन अधिकारी, (वने), महसूल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई-३२

१४) निवडनस्ती, फ-५ कार्यासन, महसूल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई-३२.